# ज्ञानज्योती स्व. प्राचार्या शुभांगीताई गावडे यांच्या जयंतीनिमित्त डीकेएएससी महाविद्यालयाच्या वतीने जांभळी येथे वृक्षारोपण व श्रमदान उत्साहात संपन्न

इचल : दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी यांच्या वतीने ज्ञानज्योती प्राचार्य सौ. शुभांगीताई गावडे यांच्या जयंतीनिमित्त जांभळी येथील ऑक्सिजन पार्कमध्ये वृक्षारोपण आणि श्रमदान कार्यक्रम उत्साहात पार पडला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. के. खाडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाच्या वतीने आम्ही जांभळीकर फाउंडेशनच्या सहयोगातून जांभळी येथील ऑक्सिजन पार्क या 20 एकर हून जास्त परिसरात पसरलेल्या वनराई मध्ये वृक्षारोपण आणि श्रमदान संपन्न झाले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस के खाडे यांनी आपल्या मनोगतातून ज्ञानज्योती स्व. प्राचार्या सौ. शुभांगीताई गावडे यांना अभिवादन केले. आम्ही जांभळीकर फाउंडेशनचे ऋषिकेश राऊत, शुभम यादव, सलमान कुडचे, लखन कांबळे, गोविंद जाधव यांचे उपक्रमास मोलाचे सहकार्य लाभले.

यावेळी एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रा. विनायक भोई, जिमखाना प्रमुख डॉ. सुचय खोपडे, प्रा. रोहित शिंगे यांच्यासह एनसीसी कॅडेट्स उपस्थित होते.




56 MAH BN NCC, KOLHAPUR
ज्ञानज्योती
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
56 MAH BN NCC KOLHAPUR


56 MAH BN NCC, K
ज्ञानज्योती
प्राचार्या सौ. शुभांगीताई गावडे
विनम्र अभिवादन..
Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji
MAH BN NCC KOLHAPUR